# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधीक्षक कार्यालय नागपूर

दिनांक २५/०७/२०२१ (रविवार )

—: आंध्रप्रदेशातुन येणारा अंमली पदार्थाची (गांजा) पकडला एकुण रुपये २८,२३,६००/— चा मुद्येमाल जप्त स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण व पो.स्टे. बुट्टीबारी यांची संयुक्त कार्यवाही :—

दिनांक २४/०७/२०२१ रोजी स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण येथील पथक नागपूर उप विभागात पेट्रोलींग करित असता खात्रीशिर गोपनिय माहिती की, ट्रक क्रमांक आर.जे. ११ जी.बी. ४६३२ मधुन राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ७ वरुन अंमली पदार्थ गांजाची वाहतुक होणार आहे. सदरची माहिती स्थानिक गुन्हे शाखा वर्धा यांना सुध्दा देवून मिळालेल्या माहिती वरुन स्थानिक गुन्हे शाखा पथक शासकीय पंचा सह राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ७ असलेला न्यु हायवे ढाबा रुईखैरी समोर नाकाबंदी करुन वाहनाची पाहणी करित असतांना ट्रक क्रमांक आर.जे. ११ जी.बी. ४६३२ हा नागपूर कडे येताना दिसला, सदर ट्रकला थांबवून त्याची तपासणी केली असता ट्रकच्या टपावरील कबिन मध्ये ४ प्लॉस्टीक बोरी आढळुन आल्याने सदर बोरी पंचा समक्ष उघडून त्याचे वास घेतले असता गांजा चा उग्र वास येत असल्याने सदर वाहनामध्ये गांजा ची अवैध वाहतुक होत असल्याचे सिध्द झाल्याने पंचासमक्ष मोक्यावर वजन करण्यात आले असता एकुण **वजन ७८ किलो ३६० ग्राम गांजा एकुण किमत ७,८३,६००/—** चा मिळून आला. नमुद ट्रक मधुन सदर अंमली पदार्थ वाहतुक करणारे तिन ईसम नामे १) भुरालाल चितरलाल मिणा वय ४० वर्ष, रा. संजय गांधीनगर जि. कोटा राजस्थान, २) अखिलेश परामराम झरिया वय २५ वर्ष रा. बागासहाई जि. जबलपूर म.प्र. ३) चोथमल सत्यनारायण मिणा वय २५ वर्ष रा. भोवरा जि. बरान, राजस्थान यांना ताब्यात घेवून पो.स्टे. बुट्टीबोरी येथे गुन्हा नोंद करण्यात आला. सदर कार्यवाही दरम्यान ट्रक क्रमांक आर.जे.११ जी.बी. ४६३२, ४ मोबाईल सह एकुण २८,२३,६००/— चा मुद्येमाल जप्त करण्यात आला.

सदरची कार्यवाही नागपुर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. राकेश ओला, अपर पोलीस अधीक्षक श्री. राहुल माकणीकर, यांचे मार्गदर्शनात स्था.गु.शा. नागपूर ग्रामीण चे पोनि अनिल जिट्टावार, सपोनि राजीव कर्मलवार, जितेन्द्र वैरागडे, सफौ बाबा केचे, पोहवा महेश, जाधव, राजेन्द्र चौधरी, निलेश बर्वे, पोना रामराव आडे, दिनेश अधापुर, सत्यशिल कोठारे, पोशि अमृत किनगे, चापोना अमोल कुथे, चापोशि आशुतोष लांजेवार, पो.स्टे. बोरी चे पोउपनि मोरखेडे, पोहवा मिलींद नांदुरकर, सतेन्द्र रंगारी, पोना राजु कापसे, पंकज ढोके, तसेच

स्थानिक गुन्हे शाखा वर्धा येथील पोहवा चंद्रकांत बुरंगे, स्वप्नील भारदवाज, राजेश तिवस्कर, पोना श्रीकांत खडसे, राजेश आष्टणकर, विकास अवचट, प्रदिप वाघ, पोका संघसेन कांबळे यांनी पुर्ण केली.
(सदर बातमीचा फोटो सोबत जोडला आहे)




## —: चोरी (हात चालाकी) :—

पो.स्टे. उमरेड :— उमरेड बस स्टॅड येथुन दिनांक १५/०७/२०२१ रोजी मकरधोकडा येथील रहीवासी अर्चना सुरेद्र लांबट ही आपले माहेरी हिंगणघाट येथे मुलगी व मुलासह निघाली, घरी कोणीही हजर नसल्याने तिने संपुर्ण सोने व नगदी पर्समध्ये घेवुन उमरेड बस स्टॅड वरून हिंगणघाट जाणारी बसमध्ये बसली असतां सीट खाली १० रू ची नोट दिसल्याने ती घेण्यासाठी वाकली, त्यावेळी कोणीतरी अज्ञात इसमांनी तिचे पर्समधील आत मध्ये एक छोटीसी पर्स मधुन सोन्याची पोत २५००० रू १४ ग्रॅम सोन्याचा गोप कि १८००० रू १२ ग्रॅम डोरले कि ३००० १ ग्रॅम कानातले सोन्याचे कि ३००० व नगदी ४५०० रू असा एकुण ५३,५०० रू चा माल पर्स मधुन काढुन चोरून नेला. अर्चना सुरेद्र लांबट फिर्यादीची प्रकृती खराब नसल्यासने तसेच पाउस येत असल्याने ती पोलीस स्टेशनला येवु शकली नाही. दिनांक २४/०७/२०२१ रोजी पो.स्टे. हजर येवून आपली रिपोर्ट नोंदविली.

सदर प्रकरणी फिर्यादी अर्चना सुरेद्र लांबट वय ४२ रा मकरधोकडा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन अज्ञात आरोपी विरुध्द पो.स्टे. उमरेड येथे कलम ३७९ भादवि चा गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास पोहवा कुलकर्णी ९४२२८१८०६२ हे करित आहेत.

**पो.स्टे. सावनेर :–** अंतर्गत मौजा पाटणसावंगी गावात असलेल्या रिलाइंन्स जिओ कंपनीचे टावर मधून पॅनासोनिक कंपनीची जुनी ०५ बॅटरी एकुण किंमत. रुपये ४०,००/– रू. चा माल कोणीतरी अज्ञात इसमांनी दिनांक २२/०७/२०२१ रोजी रात्री दरम्यान चोरुन नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी देवेन्द्र रामकृष्ण राहांगडाले वय ३२ रा.डोंगरला पो.स्ट.उमरवाडा, ता.तुमसर जि. भंडारा ह.मु.दहेगाव रंगारी, खापरखेडा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन अज्ञात आरोपी विरुध्द पो.स्टे. सावनेर येथे कलम ३७९ भादवि चा गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास पोहवा पोहवा नागरे मो.नं. ९०११५९६५०० हे करित आहेत.

## –: चोरी (चारचाकी वाहन ):–

**पो.स्टे. कन्हान :–** अंतर्गत १० किती अंतरावरील डुमरी खुर्द येथील रहवासी जर्नाधिन व्यंकटराव मदीपाटी यांनी आपल्या घरा समोर उभा ठवेलेला जांनडियर कंपनीचा ट्रॅक्टर क्र एमएच– ४० बीइ–५००८ अंदाजे ३००००० रू व आशा इंडस्टी वर्धा कंपनीची ट्रांली क एमएच–३१ जी– ९६१९ अंदाजे कि ६०,००० रू असा एकुंण ३,६०,००० रू दिनांक २३/०७/२०२१ चे रात्रीचे वेळी कोणीतरी अज्ञात इसमांनी चोरुन नेला.

सदर प्रकरणी फिर्यादी जर्नाधिन व्यंकटराव मदीपाटी वय ४६ वर्ष रा डुमरी कन्हान यांचे तोंडी रिपोर्ट वरुन अज्ञात आरोपी विरुध्द पो.स्टे. कन्हान येथे कलम ३७९ भादवि चा गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास पोहवा नरेश वरखडे मो क्र. ९६३७००५३०३ हे करित आहेत.

## –: अकस्मात मृत्यु :–

**पो.स्टे. कन्हान :–** अंतर्गत ०८ किमी अंतरावरील मौजा जुनी कामठी येथील रहवासी मनोज मनिष करनाके वय २५ वर्ष रा वार्ड न २ जुनी कामठी हा दारू पिण्याचा व नेहमी घराबाहेर राहण्याचा सवईचा होता, दिनांक २३/७/२०२१ २२/३० वा दरम्यान घरून जेवन करून घराबाहेर गेला व रात्री घरी परत आला नाही दिनांक २४.०७.२०२१ चे ०६.०० ते ०६.३० वा. त्याचे वडील सकाळी बाहेर प्राथमिक विधी करिता गेला होते, त्याना मनोज हा मनोज हा नाल्या जवळ पडलेल्या व त्याचा कानातुन व नाकातुन रक्त निघत असल्याचे आढळुन आला तो दारूच्या नशेत मरण पावला असल्याचे तोंडी रिपोर्ट वरून सदर मर्ग नोंद.

सदर प्रकरणी फिर्यादी सौ उमाबाई सिताराम करनाके वय ४८ वर्ष रा वार्ड न २ जुनी कामठी चे तोंडी रिपोर्ट वरुन पो.स्टे. कन्हान येथे मर्ग क्र.२७/२०२१ कलम १७४ जाफौ अन्वये प्रकरण नोंद करण्यात आला असून पुढील तपास सपोनि आत्राम पोस्टे कन्हान मो क्र ९४०५१ ९४३१७ हे करीत आहेत.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण) नागपूर**